MHPU200008942023

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २७/०३/२०२३ |
| नोंदणी तारीख | : | ११/०४/२०२३ |
| निकाल तारीख | : | ०५/०८/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | ०३ ०४ ०९ |

**घोडनदी शिरुर येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**ता. घोडनदी शिरुर, जिल्हा– पुणे**

(पिठासन अधिकारी – ए. जी. तांबोळी)

**नियमीत फौजदारी खटला क्रं. १५०/२०२३** **निशाणी क्र. २७**

गुन्हा नोंद क्र.१८२/२०२२

**फिर्यादी/तक्रारदार** **महाराष्ट्र शासन**
**मार्फत सहाय्यक पोलीस निरीक्षक,**
शिरुर पोलीस स्टेशन,
ता. शिरुर, जि. पुणे.

**अभियोग पक्षातर्फे** सहाय्यक सरकारी अभियोक्ता
श्री. ए. बी. शिर्के,

**आरोपी** १. **सुरेश कचरु साळुंखे,** वय २५ वर्षे,
रा.इनामगाव, ता. शिरुर, जि. पुणे.

**आरोपींतर्फे विधीज्ञ** श्री. ए. ए. चौघुले

**भाग – ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १४/०३/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १५/०३/२०२२ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २७/०३/२०२३ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १३/०७/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०५/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | निरंक, आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

## <u>आरोपींची माहिती</u>

| आरोपी चा क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | दोषी अथवा निर्दोष मुक्तता | शिक्षे बाबत विवरण | न्यायाधीन बंदी म्हणुन संपरीक्षे दरम्यान भोगलेला कारावास फौ.प्र.सं.कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुरेश कचरु साळुंखे | अटक नाही. | १६/१२/२०२२ | भा.दं.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्तता | लागु नाही. | लागु नाही |

## <u>भाग – क</u>

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये)

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्ष –**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | रुपाली सुरेश साळुंखे | फिर्यादी | २४ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| -- | -- | -- | -- |

क. न्यायालयामार्फत निशाणी (फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा)

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## न्यायनिर्णय

## (घोषणा तारीख– ०५/०८/२०२६)

प्रस्तूतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

रुपाली सुरेश साळुंखे (यांना यापुढे 'फिर्यादी' असे संबोधले जाईल), या मौजे इनामगाव, ता. शिरुर, जि. पुणे येथील रहिवासी असुन आरोपी त्यांचे पती आहेत. दि.१४/०३/२०२२ रोजी दुपारी १५.०० वाजताचे सुमारास फिर्यादी घरी असताना त्यांचे पती सुरेश कचरु साळुंके याने घरगुती कारणावरुन चिडुन जावुन फिर्यादीला लाकडी दांडयाने त्यांच्या डाव्या हाताच्या दंडावर, दोन्ही पायांवर व तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व दमदाटी करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्यानंतर फिर्यादीने शिरुर पोलीस स्टेशन येथे आरोपींविरूध्द रितसर फिर्याद दाखल केली.

३. सदरची फिर्याद गुन्हा रजिस्टर नंबर १८२/२०२२ ने नोंदविली व त्याचा तपास पोलीस नाईक एस. पी. खबाले यांचेकडे देण्यात आला. त्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपींना अटक केली, दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा केला व आरोपींच्या ताब्यातुन गुन्ह्यातील लाकडी काठी असा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला, तसा जप्ती पंचनामा केला, तपास टिपणे नोंदविले व तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**४.** त्यानंतर या प्रकरणात आरोपीवर (निशाणी २०) द्वारे भा.द.वि कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ अन्वये दोषारोप ठेवला व तो आरोपींना मराठीत वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी त्यांचे वरील सर्व आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

**५.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व आरोपींनी न्यायालया बाहेर आपआपसात तडजोड झाल्याबाबतची पुरसीस निशाणी २३ अन्वये दाखल केली आहे.

**६.** तसेच निशाणी १ वरील आदेशान्वये अभिलेखावर आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ प्रमाणे निवेदन नोंदविलेले नाही.

**७.** अभिलेख, पुरावे व युक्तीवाद पाहता, सदर प्रकरणात निकालासाठी खालील मुद्दे निघतात, ते मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | मुद्दे. | निष्कर्ष. |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, दि. १४/०३/२०२२ रोजी दुपारी ०३.०० वाजताचे सुमारास आरोपीने फिर्यादी यांना काठीने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचवली ? | ... **नकारार्थी.** |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना हाताने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करुन दुखापत पोहोचवली ? | ... **नकारार्थी.** |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली ? | ... **नकारार्थी.** |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले आहे काय की, उपरोक्त तारखेस, | ... **नकारार्थी.** |

वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी दिली ?

५. काय आदेश ? **अंतिम आदेशाप्रमाणे**

## <u>कारणे</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ ते ५ करिता –</u>**

८. सर्व मुद्दे हे परस्पर संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन एकत्रात केलेले आहे. सदर प्रकरणात फिर्यादीमधील मजकूर शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने फिर्यादी रुपाली सुरेश साळुंके यांना तपासले. फिर्यादीने निशाणी २४ पुराव्यात असे कथन केले की, घटना दोन ते तीन वर्षांपुर्वी घडली. आरोपी त्यांचे पती आहेत. घटनेदिवशी त्यांचे व आरोपीचे किरकोळ भांडण झाले होते. त्यानंतर त्यांनी आरोपींविरुध्द तक्रार दिली होती. दिनांक १५/०३/२०२२ रोजीचा जबानी रिपोर्ट व छापील प्रथम खबरी अहवालवर त्याच्या सह्या असून त्यातील मजकुर माहित नसल्याचे फिर्यादीने कथन केले.

९. मा. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी फिर्यादीस न्यायालयाच्या परवानगीने फितुर घोषित करून उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षाच्या खटल्यास दुजोर मिळेल अशी कुठलीही बाब ते अभिलेखावर आणू शकले नाहीत.

१०. एकंदरीत पुराव्याचे साखल्याने अवलोकन केले असता असे दिसते की, आरोपी याने फिर्यादी यांना घरगुती कारणावरुन काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ व धमकी दिली, याबाबत काही एक कथन त्यांच्या पुराव्यात केलेले नाही. म्हणून अभियोग पक्ष आरोपीविरूध्द तोहमत असलेल्या गुन्ह्याचे घटक वरील साक्षीदाराच्या पुराव्यात अभिलेखावर आणण्यास असमर्थ ठरल्याचे दिसते. तसेच, अभियोगपक्षाने इतर कुठलाही सबळ पुरावा समोर आणलेला नाही. थोडक्यात, अभियोगपक्ष आरोपीवरील आरोप संशयापलीकडे शाबीत करण्यास असफल ठरलेले

आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ चा निष्कर्ष '**नकारार्थी**' नोंदविला असून मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. आरोपी सुरेश कचरु साळुंखे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६ खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन मुचलके रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत आदेशापासुन एक महिन्याचे आत सादर करावे.

४. जप्त मुद्येमाल एक लाकडी काठी मुल्यरहित असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर त्याची नियमाप्रमाणे विल्हेवाट लावण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

TAMBOLI ASIF GULAMDASTGIR

Digitally signed by TAMBOLI ASIF GULAMDASTGIR
Date: 2026.08.05 16:23:18 +0530

दिनांक– ०५/०८/२०२६

**(ए. जी. तांबोळी)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.४), घोडनदी शिरुर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Steno | S. S. Gade |
| Name of the Court | Judicial Magistrate First Class,<br>Ghodnadi Shirur, Dist. Pune |
| Date of Order & Judgment | 05/08/2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. on | 05/08/2026 |
| Order/Judgment uploaded on | 05/08/2026 |